हीरकमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

स्थापना : १९६४

६०

# मासिक नवस्नेह

ब्रह्मतेजो बलंबलम्

वर्ष ९ वे : अंक १२
मार्च २०२४

स्वागतमूल्य ₹. 30/-



प्रेषक
**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**
४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ,
कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१-२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५
Visit us on www.kolhapurchitpavan.com
ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com
https: //www.facebook.com/kolhapurchitpavan

## कोल्हापूर चित्पावन संघाच्या ‘We For Ours’ तर्फे आयोजित

# पहिल्या ‘कला महोत्सव’ ची क्षणचित्रे



# कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

# नवस्नेह

**वर्ष ९ वे : अंक १२ : मार्च २०२४**

- **संपादक** श्री. सदानंद दिनकर मराठे
- **कार्यकारी संपादिका** प्रा.सौ. मंजुश्री गोखले 8805355200
- **सल्लागार** सौ. पल्लवी देशमुख 9420455984


## अनुक्रम


१) **संपादकीय** /४

२) **भ्रमनिरास** /५ - सौ. कमल हर्डीकर

३) **माझी बँकेतील मुशाफिरी** /९
- श्रीकांत शिंत्रे, शब्दांकन : सौ. ज्योत्स्ना शिंत्रे

४) **मुलांचे पान** / १२

५) **ज्ञानसूर्याची सावली** /१४ - सौ. मंजुश्री गोखले

६) **सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी'** / १७
- सौ. मंजुश्री गोखले

७) **सुमन कल्याणपूर**/ १८ - कृपा देशपांडे

८) **मुस्लिम स्त्री कलाकार** /२२ - प्रकाश गानू

९) **काय आहे आपल्या देशातील राज्यांच्या नावामागील लॉजिक? जाणून घ्या** / २३
- संकलित

१०) **वधूवर माहिती यादी** /२५



- **मुद्रण स्थळ** मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर. मोबा. ९९२१६६९६६६
- **अक्षरजुळणी** ज्योती अरुण काटवे<br>विराज कॉम्प्युटर सर्व्हिसेस,<br>कोल्हापूर. मोबा. ९०२१२३४८९०




सुवर्णमहोत्सवी

## कोल्हापूर चित्पावन संघ

मंगळवार पेठ, फोन : ०२३१-२५४६२२५<br>
०२३१-२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५

- **संचालक मंडळ**

**श्री. मकरंद विष्णू करंदीकर** (अध्यक्ष)<br>
9421113005<br>
**श्री. प्रसाद प्रभाकर भिडे** (उपाध्यक्ष)<br>
9822248500<br>
**श्री. केदार वसंत जोशी** (कार्यवाह)<br>
7588839527<br>
**श्री. संतोष वसंतराव साने** (सहकार्यवाह)<br>
9881077513<br>
**सौ. संगिता संजय आपटे** (खजिनदार)<br>
8149480034

- **संचालक**

श्री. सदानंद दिनकर मराठे 0231-2541823<br>
सौ. सीमा सुरेश गोखले 9420455159<br>
श्री. हृषिकेश भालचंद्र लिमये 9404260470<br>
श्री. किरण विनायक जोशी 9890003810<br>
श्री. श्रीकांत अनंत लिमये 9423980380<br>
श्री. दत्तात्रय वामन आपटे 9422043366

- **तज्ञ सल्लागार**

श्री. प्रसाद खाडिलकर 9822084305

- **सल्लागार**


श्री. विष्णू दिनकर वझे 9637255984<br>
श्री. मोहन मधुकर दातार 9881874701<br>
श्री. शिरीष श. ताम्हनकर 9422590025<br>
श्री. निनाद खरे 7057151549<br>
श्री. महेश खाडिलकर 9422046611

**कामकाजाची वेळ**<br>
**सकाळी १० ते सायंकाळी ६ (साप्ताहिक सुट्टी नाही)**


या अंकातील लेखातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.


**'नवस्नेह' मासिकाची ठेव, वर्गणी अगर इतर कोणत्याही पेमेंटसाठी 'कोल्हापूर चित्पावन संघाचे' खात्यांची माहिती पान क्र. २३ वर दिली आहे.**

# संपादकीय...



नमस्कार मंडळी !

अहो थंडी गेली की पळून आणि सूर्य लागलाय तापायला, आणि पाण्याचंही संकट येऊ घातलंय. आता अजून मार्च, एप्रिल, मे आणि अर्धा जून जायचा आहे ! या परिस्थितीत दिलासा देणाऱ्या दोन गोष्टी. एक प्राणप्रतिष्ठा झालेला रामलल्ला म्हणजे बालकराम आणि दुसरा आपला नवस्नेहचा अंक ! बाकी मुलांच्या परीक्षा, उष्मा, महागाई, पाणी टंचाई हे सगळं रूटीनच आहे, नाही का? अर्थात या सगळ्या परिस्थितीला 'आलिया भोगासी असावे सादर !' असं मानून हसतच तोंड दिलं पाहिजे. कारण

**मुस्कुराहट कठिण वक्त की**
**श्रेष्ठ प्रतिक्रिया है ।**
**और खामोशी गलत प्रश्न का**
**बेहतरीन जवाब ।**

अर्थात 'गलत प्रश्न' आपण विचारतच नाही. असो.

मित्रांनो, आपल्या अंकात मुस्लिम स्त्री कलाकार तसेच बँकिंग क्षेत्रातील विलक्षण अनुभव आणि भ्रमनिरास या नवीन लेखमाला मागच्या अंकापासून सुरू केल्या आहेत. आपल्या प्रतिक्रियांच्या प्रतिक्षेत आहोत. आणखी एक म्हणजे फेब्रुवारीच्या अंकात आम्ही छापलेल्या 'राम मंदिराचा रक्तरंजित इतिहास' या लेखासंदर्भात बरेच फोन आले. कामांची दखल घेतली गेली, बरं वाटलं ! मित्रांनो, अशी घेतली गेलेली दखलच आम्हाला हुरूप देते. म्हणूनच तर आपल्या अभिप्रायांच्या प्रतिक्षेत असतो आम्ही.

आता लवकरच महाशिवरात्री आहे. म्हणजे थंडी नक्की निरोप घेणार. आणि महिना अखेरी होळी पौर्णिमा आहे. मनांतली सगळी किल्मिषं 'अग्नेय स्वाहा' करण्याचा सण ! मनातली किल्मिषं जाळून टाकायची आणि निर्मळ मनानं पुरणपोळीचा आस्वाद घ्यायचा ! मगच छान लागते म्हणे पुरणपोळी ! खरंच, आपल्या प्रत्येक सणामागे किती छान संकेत आहेत ना? फक्त ते जाणून घेतले पाहिजेत आणि मन मोकळं केलं पाहिजे. कारण –

**मन की बात कह देने से**
**फैसले हो जाते है ।**
**और**
**मन में रख लेने से**
**फासले हो जाते है ।**

तेव्हा सणांचे संकेत जाणून मन मोकळे करूया आणि आनंदाने सण साजरे करूया ! थांबते!

धन्यवाद !

आपली स्नेहांकिता,
**सौ. मंजुश्री गोखले,**
मो. ८८०५३५५२००

**नवीन तहहयात सभासद होण्याची संधी**

**संघाची सभासद वृद्धी योजना सुरू झाली असून या योजनेत रु. २६०/– मध्ये तहहयात सभासद होण्याची संधी मिळणार आहे. तरी ज्ञाती बांधवांनी या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा.**

# भ्रमनिरास

**(लेखांक २)**

लता-माईची खूप जुनी मैत्रीण. वरचेवर दोघी एकमेकींकडे जात येत. तिच्याकडे जाताना माई नेहमी त्यांनी घरी केलेला खाऊ घेऊन जात, पण आज मनात असूनही नेहाचं कानावर पडत असलेलं बोलणं ऐकून त्या तशाच परत फिरल्या. वाटेत मिठाईच्या दुकानांतून मिठाई घेऊन त्या लताकडे गेल्या. निवांत गप्पा मारत रात्रीचा स्वयंपाक करण्याचा परिपाठ आज त्यांनी मोडला. माई घरी आल्या तेव्हा आठ वाजायला आले होते. घरांत तसं शांतच होतं. 'मी घरी येऊन स्वयंपाक करते, तू दगदग करू नको' असं माईंनी सांगितल्यामुळे असेल, स्वयंपाकघर शांतच होतं. हातपाय धुवून माईंनी कुकरखालचा गॅस लावला. भाजी-कोशिंबीर पुरेशी होती. ९ वाजता पानं घेऊन त्यांनी सगळ्यांना आवाज दिला. नेहा तशी घुश्श्यातच आहे असं माईंना वाटलं, पण त्यांनी तसं काहीच भासू दिलं नाही. आवराआवर आटोपून सारीजणं झोपायला गेली. माईंनी अंथरुणावर पाठ टेकली, पण त्यांना झोप येईना. नेहाचं बोलणं आठवून आपण ज्वालामुखीच्या तोंडावर उभ्या आहोत, असं त्यांना वाटू लागलं.

नेहाचं सारं बोलणं त्यांना पुन्हा आठवू लागलं. तिचं बोलणं केवळ सकारात्मकच नाही, तर स्वीकारात्मकतेनं आपल्याला घ्यायचं आहे हे त्यांनी स्वत:ला बजावलं. त्यांना नवल वाटलं. आपला मुलगा प्रथमेश आपली बाजू घेऊन एकदाही नेहाशी कां बोलला नाही? नोकरी आणि घर दोन्ही सांभाळणं यामध्ये नेहाची फरफट, ओढाताण होऊ नये म्हणून आई सर्व कांही करते असं आपला मुलगा प्रथमेश तिला कां सांगत नव्हता? याचं माईंना राहून राहून आश्चर्य वाटत होतं. कहर म्हणजे बदली करून घेणं सोपं नाही, पण त्यासाठी उद्यापासूनच प्रयत्न करू असं तो नेहाला आश्वासन देत होता. आम्ही हळूहळू शरीरानं थकणार आहोत, आम्हाला माणसांची गरज आहे, त्याप्रमाणे मुलं मोठी होईतोवर त्यांना अधूनमधून कां होईना आमची गरज लागणार आहे याची जाणीव नेहाला करून द्यावी लागेल. पण हे घाईघाईनं करून चालणार नाही हे निश्चित. धीर धरावा लागेल. योग्य संधी आणि वेळ आली पाहिजे.

माईंच्या मनात विचार आला. नेहाची ऑफिसला जाण्याची आवराआवर सुरू होईतोवर तिला काम करू द्यावं. त्यानंतरचं सारं मग आपण करत रहावं. संध्याकाळी ती दोघं घरी आल्यानंतर त्यांना चहा करून देऊन आपण तास-दीड तास बाहेर पडावं. पण या साऱ्या विचारासरशी तिला शेजारच्या मीनाताईंची सून हेमाचे शब्द आठवले. ती एकदा घरी आलेली असताना माईंना म्हणत होती, 'माई तुम्ही खरंच किती करता? तुमची नेहा फारच नशीबवान आहे. आरामात नोकरी करायची, घरातल्या बारीक सारीक गोष्टींची तिला जराही कटकट नाही. नाहीतर आमच्या आई... अगदी ठराविक कामं करतात. अगदी कामवाल्या मावशी कसं ठरलेलं काम करतात, मुद्दाम आम्ही सांगितलं तरच जादाचं काम करणार. अतिशयोक्ती वाटेल, पण आमच्या आईंचं थोडंफार असंच आहे. आई मला कंटाला आला आहे, संध्याकाळचा स्वयंपाक आज तुम्ही कराल का? म्हटले तर करतील. आपणहून नाही. स्वयंपाकाच्या ओट्यापाशी आम्ही दोघी फार क्वचित एकत्रित असतो.'

न राहवून माई बोलल्या, 'अगं बरोबर आहे. ओट्याची जागा लहान असते. तुम्ही तरुण असता. वयाबरोबर आम्हाला तुमच्याइतकं चटचट हालता येत नाही. त्यामुळे उलट तुम्हाला अडचणीचं नाही का होणार? म्हणून तुझी सासू तुझ्याबरोबरीनं ओट्याशी येत नसेल. पण मला वाटतं, चहा, नाश्ता, दूध तापवणं, विजरण लावणं, ताक करणं, लोणी

कढवणं असली बारीक सारीक कामं तुझ्या सासूबाई करत असतील ना? बऱ्याच वेळेला भाजी निवडतानाही त्या मला दिसतात.' काहीशी नाराज होऊन हेमा 'हो' म्हणाली, पण तिनं पुढे पालुपद जोडलच.

'पण माझा एकटीचाच संसार आहे का? माझा नवरा, माझी मुलं त्यांची पण आहेतच ना? संध्याकाळच्या चहाबरोबर कांहीतरी हलकं-फुलकं खायला आमच्यात सर्वांना लागतं. बाहेरनं विकत आणण्यापेक्षा तुम्हीच काहीतरी करून ठेवत जा असं मी आईंना सांगणार आहे. किती झालं तरी, घरच्या खाण्याची सर बाहेरच्या, विकतच्या खाण्याला कशी काय येणार ना?' यावर माई तरी काय बोलणार? त्या निरुत्तर होऊन शांत राहिल्या.

पण हा सारा संवाद आठवल्यावर ठराविक काम करण्याचा माईंचा विचार मात्र बारगळला. विचारांच्या आवर्तात माई खूप वेळ जाग्या होत्या. उशिरा केव्हातरी त्यांना झोप लागली. नेहमीच्या सवयीनं सकाळी साडेसहाला त्यांना जाग आली. रोजच्याप्रमाणं त्यांची सर्व कामं एकापाठोपाठ एक सुरू होती. पण त्यात रोजचा उत्साह नव्हता. काहीशा यंत्रवतपणे त्या सारं काही करत होत्या. आपल्या माणसांच्यात रहावं ही जशी उतारवयाची गरज असते, त्याप्रमाणे राजा-राणीच्या संसारात घराबाहेर पडताना कुलूप लावत बसण्याची आणि किल्ली सांभाळत राहण्याची गरज पडू नये यासाठी घरात कुणीतरी घर राखणारं माणूस असलंच पाहिजे, हेही नेहा-प्रथमेशला कळलं पाहिजे असं माईंना अगदी आतून वाटत होतं. लहान मूल पावलं टाकायला लागतं, चालायला लागतं तेव्हा त्यालाही पांगुळगाड्याचा किंवा कशाचा तरी आधार द्यावा लागतोच ना? असे असंख्य विचार माईंच्या मनात येत राहत. विचारांच्या वादळात नेमका मार्ग सापडत नव्हता. एक दिवस अचानकच एक मार्ग, एक वाट निर्माण झाली.

जेमतेम चार-पाच दिवस झाले असतील. संध्याकाळी सहाच्या सुमारास आप्पांना जावयाचा सांगलीहून फोन आला. 'आप्पा, मला आणि नीताला स्कूटरचा छोटासा अपघात झाला आहे. तसा किरकोळच प्रकार आहे. थोडक्यात निभावलं ही भगवंताची कृपा. बऱ्यापैकी मुका मार लागला आहे. दोघांचाही एक हात हेअर लाईन फ्रॅक्चरमुळे प्लास्टरमध्ये जायबंदी झाला आहे. आम्ही दोघेही कांही वेळापूर्वी दवाखान्यातून आलो आहोत. मुलं गोंधळली आहेत. पण स्वत:ला सावरत आहेत. आठ दिवसांपूर्वीच आई-दादा ताईकडे न्यूझिलंडला गेले आहेत. त्यांना कळवून तातडीने बोलावणे अप्रशस्त वाटते. ते दोघे इथं असते, तर तुम्हालाही लगेच काही कळवले नसते. लटपटत्या डोलाऱ्याला टेकू तर हवाच. तुम्ही उभयता निश्चित याल या खात्रीने हा फोन करत आहे. उद्या सकाळी उशिरात उशीर नऊ वाजेपर्यंत तुम्हाला इकडे आणण्यासाठी गाडी पाठवत आहे. नक्की या ! तुमची अगदी मनापासून आणि आतुरतेने वाटत पहात आहे !'

'काही काळजी करू नका. आम्ही दोघं नक्की येऊ.' असं सांगून आप्पांनी फोन बंद केला आणि नेहमीप्रमाणे वाचनालयात तास दोन तास न थांबता आप्पा लगेच घरी आले.

नेहा आणि प्रथमेश नुकतेच घरी आले होते. त्यांनी माईंसह त्या दोघांना बाहेरच्या खोलीत बोलावून सर्व हकिकत सांगितली आणि उद्या सकाळी गाडी येईल तेव्हा तयार राहून आम्ही दोघे जाऊ असं सांगितलं. जाता जाता ते माईंना म्हणाले, 'हे पहा, नेहमीसारखं स्वयंपाकघरात घोटाळत राहू नका. तुमच्या सामानाची बॅग अगदी तयार ठेवा. गडबडीत नीताच्या मुलांसाठी खाऊ करत बसू नका. घरात आधी काय केलं असेल त्यातलच काहीतरी घ्या.' माई आणि आप्पा त्यातल्या त्यात माईआजी किमान दिड महिना घरी नसणार या विचाराने सुयश काहीसा रडवेला झाला. 'माईआज्जी, आत्याला बरं वाटलं की तू लगेच परत ये. नाहीतर त्या सर्वांना इकडे आण ना गं !' असं काहीसं बोलत राहिला.

सामानाची बॅग भरून, काय थोडाफार स्वयंपाक करायचा होता तो आवरून, नेहमीप्रमाणे सर्वजण नऊ वाजता जेवायला बसले.

सकाळी सव्वा आठलाच गाडी आली. आप्पा-माई दोघेही तयारच होते. ड्रायव्हरना चहा-नाश्ता दिल्यावर नऊच्या आधीच गाडीने आप्पा नि माईंसह प्रयाण केले. माई-आप्पांना समोर पाहून जावईबापूंचे डोळे भरून आले. ते म्हणाले, 'जराही आढेवेढे न घेता आणि कोणतीही सबब न सांगता आप्पा तुम्ही माईंसह इथं आलात. कोणत्या शब्दांत तुमचे आभार मानू हेच समजत नाही !'

'अहो, आभाराची भाषा करून आम्हाला परकं करू नका. आता या वयात 'जिथं कमी तिथं आम्ही' या भावनेनं गरज असेल तिथं जाऊन होईल तेवढा उपयोग करायचा. आता निर्धास्त राहा आणि लौकर छान बरे व्हा !'

गेल्या अनेक वर्षांच्या सवयीमुळे माई रविवारी एकदम भाज्या आणून शक्य तर निवडून फ्रीजमध्ये ठेवत असत. मंगळवारी माई गावाला गेल्या, पण आठवड्याच्या भाज्या तयार होत्या. माई-आप्पा बाहेर पडल्यानंतर साडेनऊ वाजता पोळ्या करणाऱ्या मावशी आल्या. आत येताच त्यांचं बोलणं सुरू झालं. माई कुठं दिसत नाहीत? तब्बेत बरी आहे ना? गेले आठ-दहा दिवस त्या जरा गप्प गप्प वाटत होत्या. आणि हे काय, पोळ्या करायच्या आहेत ना? अजून कणिक पण भिजवली नाही. किती पोळ्या करायच्या त्या बेतानं माई कणिक भिजवून ठेवतात. कणिक आधीपासून भिजवली की पोळ्या पण चांगल्या होतात.

'अहो, हो हो... मावशी मला बोलू तर द्या. माई-आप्पा महिना-दीड महिन्यासाठी गावाला-त्यांच्या लेकीकडे गेले आहेत. मला जमेल तेव्हा मी कणिक भिजवेन. नाहीतर तुम्ही कणिक भिजवून पोळ्या करत जा. आज फक्त सात पोळ्या करा.' असं सांगून नेहा भाजीकडे वळली. पोटभर नाश्ता झाला आहे. डब्यापुरत्याच पोळ्या हव्या. संध्याकाळी कांहीतरी छान वेगळं करू असा बेत तिने आखला.

सव्वा-दहा वाजायला आले. सगळ्यांची बाहेर पडण्याची घाई सुरू झाली आणि भांडी, केर-फरशी करणाऱ्या ताई आल्या. त्या एकदाच येत. आल्याआल्या वॉशिंग मशीन लावून, इतर कामं संपवून कपडे वाळत घालून त्या जात. नेहा त्यांना म्हणाली, 'आता आज सगळं काम राहू दे. माई-आप्पा महिना-दीड महिन्यासाठी गावाला गेले आहेत. त्यामुळे तुमची कामाची वेळ पण बदलावी लागेल. त्या म्हणाल्या, 'ठीक आहे, मी सकाळी सात-साडेसातला येईन किंवा संध्याकाळी साडे पाच नंतर येईन.' नेहा म्हणाली, 'ठीक आहे. उद्यापासून तुम्ही सकाळी साडेसात पर्यंत या.'

आता आपण तिघंही बाहेर जाणार. आप्पा-माई दोघंही घरी नाहीत. त्यामुळे घराला कुलुप लावलं पाहिजे. त्यामुळे आज ऑफिसमधून परत येताना किल्ल्यांचा आणि एक सेट केला पाहिजे. म्हणजे प्रत्येकाकडे किल्ली राहील. शेजाऱ्यांकडे इतके दिवस रोज किल्ली ठेवणं आणि आणणं योग्य होणार नाही. ऑफिसचं काम संपायला नेमका थोडा उशीर झाला आणि त्यानंतर हे किल्लीचं काम संपवून घरी यायला नेहाला खूपच उशीर झाला होता. घरी आल्यावर चहाही तिचा तिलाच करून घ्यावा लागला. ती प्रथमेशला म्हणाली, 'रात्रीचा स्वयंपाक करण्याचं बळ आता माझ्या अंगात नाही. होम डिलिव्हरीनं रोटी, २ भाज्या, पुलाव असंच मागवूया.' रात्रीची जेवणं होऊन पुलाव आणि भाज्या उरल्या. सकाळी फक्त पोळ्यावर काम भागलं. नेहा खूष होती. पण ओळीनं दोन वेळा बाहेरच्या खाण्यामुळे असेल तिघांचीही पोटं थोडीशी कुरकुरत होती.

मंगळवार ते शनिवार संध्याकाळ कापरासारखे दिवस भुर्रकन उडाले. उद्या रविवार सुटीचा दिवस. माई-आप्पा या दिवशीही लौकर उठून बसतात. त्यामुळे मनात असूनही आठ-साडेआठ पर्यंत लोळत

पडता येत नाही. आता उद्या अगदी निवांत उठायचं असं नेहानं ठरवलं. सकाळी नेहा आरामांत उठली. चहा करण्यासाठी स्वयंपाकघरात आली, तर काल दुपारच्या आणि रात्रीच्या जेवणाची सर्व भांडी बेसिनमध्ये 'आ' वासून पडली होती. तिच्या डोक्यात रागाची सणक आली. तिरमिरीतच तिनं त्यांना फोन लावला आणि बोलू लागली, 'अहो ताई, आज तुम्ही कामावर येणार नव्हता, तर मला कालच कळवायचं नाही का?'

'अहो नेहाताई, मी सकाळी बरोबर साडेसातला कामावर आले होते. बंगल्याच्या गेटला कुलूप होतं. मी बाहेरूनच हाका मारल्या. फोन पण केला. पण तुमचा फोन सायलेंटवर.आता मी उद्याच येणार. सगळी भांडी टबमध्ये ठेवा. मशीनपण मी उद्याच लावणार.' नेहानं कपाळावर हात लावला. सकाळच्या चहाची चवच बिघडून गेली होती. भाजीसाठी फ्रीज उघडला तर सकाळपुरती भाजी होईल एवढे दोडके आणि तीन टोमॅटो होते. म्हणजे आज भाजी पण आणावी लागेल. नेहाने निवांत बसून चहा अगदी चवीने पित असलेल्या प्रथमेशची तंद्री मोडली आणि त्याला ती म्हणाली, 'हे बघा, तुमची आंघोळ वगैरे उरकून मंडईत जाऊन आठवडाभरासाठी भाज्या आणि काकडी, गाजर, टोमॅटो वगैरे कोशिंबीरीसाठी घेऊन या.'

'हे बघ, मला भाजीतलं काहीही कळत नाही. तूच दुपारनंतर जाऊन ये.'

मध्येच सुयशनं हुकूम सोडला, 'ए आई, पालेभाजी पण घेऊन ये. मस्त भाजी. अगदी माई आजी करते तशी आणि वर उसळी मिरचीची फोडणी!'

'तुम्ही नुसत्या आज्ञा सोडा. कुणी कांही करू नका. ती पालेभाजी निवडत बसायला माझ्याकडे वेळ कुठं आहे? पुढच्या आठवड्यानंतर बघू.' हे सारं कसं पार पाडायचं याचा नेहा विचार करत असतानाच दारावरची बेल वाजली. दारात दुधवाले मामा उभे होते. 'माझा दुधाचा हिशेब केला कां? आज दोन तारीख.'


नेहा शांतपणे म्हणाली, 'उद्या संध्याकाळी या.' तिनं आजचं मरण उद्यावर ढकललं इतकंच.

**– सौ. कमल हर्डीकर,**
मोबा. ९६८९३६९९२६

**दिनविशेष (मार्च २०२४)**
**माघ-फाल्गुन १९४५**
**शोभननाम संवत्सरे**

**सौजन्य : श्री महालक्ष्मी दिनदर्शिका**

**श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे।**
**साक्षात लक्ष्मी वसे तिथे।**



**रविवार दि. ३ :** गजानन महा.प्रकट दिन, **मंगळवार दि. ५ :** श्रीरामदास नवमी, **शुक्रवार दि. ८ :** महाशिवरात्री, संत गाडगेबाबा जयंती, जागतिक महिला दिन, **शनिवार दि. ९ :** अमावास्या, **रविवार दि. १० :** ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुण्यदिन, **सोमवार दि. ११ :** छत्रपती संभाजीराजे बलिदान दिन, **मंगळवार दि. १२ :** रामकृष्ण परमहंस जयंती, **शुक्रवार दि. १५ :** जागतिक ग्राहक हक्क दिन, **शनिवार दि. १५ :** राष्ट्रीय लसीकरण दिन, **गुरुवार दि. २१ :** जागतिक वनीकरण दिन, **शुक्रवार दि. २२ :** जागतिक जल दिन, **शनिवार दि. २३ :** क्रांतिवीर भगतसिंग, राजगुरु, सुखदेव शहीद दिन, जागतिक हवामान दिन, **रविवार दि. २४ :** हुताशनी पौर्णिमा, जागतिक क्षयरोग दिन, **सोमवार दि. २५ :** धुलिवंदन, **मंगळवार दि. २६ :** वसंतोत्सवारंभ, **बुधवार दि. २७ :** संत तुकाराम बीज, जागतिक रंगभूमी दिन, **गुरुवार दि. २८ :** संकष्ट चतुर्थी (चंद्रो. ९.१९), शिवजयंती (तिथीप्रमाणे), **शुक्रवार दि. २९ :** गुडफ्रायडे, **शनिवार दि. ३० :** रंगपंचमी, **रविवार दि. ३१ :** ईस्टर संडे, संत एकनाथ षष्ठी.

# माझी बँकेतील मुशाफिरी

## (एका बँक अधिकाऱ्याचे विलक्षण अनुभव)

पहिल्याच प्रमोशनच्या वेळी माझी नेमणूक एका शाखेत उपशाखा प्रबंधक म्हणून झाली. एकीकडे बढतीचा आनंद होता, दुसरीकडे धास्ती होती. कारण जरी माझी बँकेत दहा वर्षे नोकरी झाली होती तरी बहुतांश; मी प्रशासकीय कार्यालयात काम केले होते आणि बँकिंग व्यवहाराचा मला विशेष अनुभव नव्हता. अर्थात शाखेत काम करायची उत्सुकता होतीच.

माझे शाखा प्रबंधक खूप वरिष्ठ आणि अनुभवी होते. ते आमच्यासारख्या नवोदित कनिष्ठ सहकाऱ्यांना खूप छान सांभाळून घेत असत. आम्हाला प्रत्यक्ष काम करायला लावून काम करता करता अनुभव देत असत. त्यांच्यामुळे ग्राहका बरोबर चांगले संबंध ठेवावेत हेही मी शिकलो.

माझी नेमणूक विदेश विनिमय (FOREIGN EXCHNGE) खात्यात झाली होती. या खात्यात आयातदार (इम्पोर्टर) आणि निर्यातदार (एक्सपोर्टर) यांचे बँकिंग व्यवहार आणि तत्सबंधी आर्थिक उलाढाल – त्यांना कर्जाची व्यवस्था, हमीपत्रे वगैरे वगैरे होत असत.

येथे हे स्पष्ट करावयास हवे की मालाची प्रत्यक्ष वाहतूक जहाजाने किंवा विमानाने होते आणि बँकेद्वारा फक्त संबंधित कागदपत्रे भारतातून परदेशी जातात किंवा परदेशातून भारतात येतात आणि पैसे देऊन निर्यातदार किंवा आयातदार ही कागदपत्रे ताब्यात घेतो आणि कागदपत्रे देऊन वाहतूक कंपनीतून माल मिळवतो. अशा तऱ्हेने बँकेचा सहभाग फक्त कागदपत्रांपुरता मर्यादित असतो आणि प्रत्यक्ष मालाचा असा बँकेचा काहीच संबंध नसतो आणि माल चांगला आहे की खराब आहे याला बँक जबाबदार नसते. एका निर्यातदाराला बँकेने कर्ज दिले होते– इथून माल विकत घेण्यासाठी. अर्थात तो माल तो पुढे निर्यात करणार होता आणि परदेशी ग्राहकांकडून आलेल्या पैशातून तो बँकेच्या पैशाची परतफेड करणार होता. काही कारणामुळे या ग्राहकाने माल थोडा उशीरा पाठवायला सांगितले. त्यामुळे निर्यातदारांचे पैसे अडकून पडले. तो बँकेचे पैसे पण वेळेवर देऊ शकला नाही. निर्यात कधी होईल याची खात्री नव्हती. माल आपल्या ताब्यात घेऊन, तो स्थानिक बाजारात विकून, पैसे मिळवून कर्ज फेडणे हा एकच पर्याय बँकेसमोर होता आणि तो आम्ही कर्जदारासमोर ठेवला आणि त्याने तो मान्यही केला आणि स्वेच्छेने मालाचा ताबा बँकेला द्यायचे कबूल केले. अस्मादिकांची नेमणूक या ताबा घेण्याच्या कामगिरीवर झाली. मी याबद्दलची सारी नियमावली वाचून बँकेचे कुलूप घेऊन गोडाउनला गेलो आणि रीतसर पंचनामा करून कर्जदाराच्या समक्ष आणि संमतीने मालाचा ताबा घेतला, दरवाजाला बँकेचे कुलूप लावले आणि उत्साहाने प्रबंधक साहेबांना रिपोर्ट केला आणि त्यांनी शाबासकीही दिली. दुसऱ्या दिवशी साहेब स्वतः ते गोडाउन पाहायला गेले. आणि शाखेला परत आले तो गंभीर चेहरा करूनच ! मला त्यांनी केबिनमध्ये बोलावलेआणि विचारले, तू बरोबर ताबा घेतला आहेस ना ?

'हो.' मी.

साहेब – 'अरे, त्या गोडाउनला दोन दरवाजे आहेत, तू एकाच दरवाज्याला बँकेचे टाळे लावलेस, दुसऱ्याचे काय? त्या दरवाज्यातून कस्टमर माल बाहेर काढू शकतो, बँकेला न कळता ! आणि मग पूर्ण जबाबदारी बँकेवर येईल, कारण पंचनामा करून आपण ताबा घेतला आहे आणि मालाची पूर्ण सुरक्षितपणाची जबाबदारी बँकेवर आहे !'

माझ्या पायाखालची जमीनच सरकली . चेहरा कावराबावरा झाला. साहेब हसले. म्हणाले, 'घाबरू नकोस. कस्टमर काही माल काढून नेणार नाही !' दुसऱ्या दरवाजाची गोष्ट त्यानेच मला सांगितली !

'एका महिन्यातच कस्टमर माल निर्यात करणार आहे आणि निर्यातीच्या पैशातून खाते बंद होईल. पण ताबा घेताना गोडाउनच्या भोवती चोहोबाजू फिरून एकूण दरवाजे किती आहेत हे बघितले पाहिजे हा तुला मिळालेला धडा !' नंतर कस्टमरने खरोखरच माल उचलला, निर्यात केला आणि बँकेचे पैसे परत केले परंतु तोपर्यंत माझा जीव टांगणीला लागला होता ! यातून मी दोन गोष्टी शिकलो, एक थिअरी आणि प्रॅक्टिकलमध्ये फरक असतो. नुसती नियमावली वाचून मालाचा योग्य ताबा घेता येत नाही. त्याकरता अनुभवाची जोड लागते, दोन, बहुतांशी कस्टमर चांगले असतात आणि त्यांना बँकेशी दीर्घकालीन संबंध ठेवायचा असतो आणि ते गैरफायदा घेत नाहीत.

एका दुसऱ्या प्रकरणात, निर्यातदाराने माल निर्यात केला. आमच्याकडे संबंधित कागदपत्रे दिली. आम्ही ती परदेशी पाठवली. परदेशी बँकेने पैसे पाठवले. आम्ही ते पैसे निर्यातदाराच्या खात्यात जमा केले. त्याने ते पैसे काढून घेतले. त्यानंतर परदेशी बँकेने कळवले की संबंधित माल बोगस आहे, सबब पैसे परत करावेत. पण पैसे कस्टमरला दिले असल्याने आणि त्याने ते काढून घेतले असल्याने आम्हाला ते पैसे परत करणे शक्यच नव्हते आणि आम्ही तसे परदेशी बँकेला कळवले. ह्या मालाचा व्यवहार युनोच्या विकास कार्यक्रमाअंतर्गत झालेला होता आणि जवळजवळ एक कोटी रुपयांचा होता. म्हणून परदेशी बँकेने इंटरपोलकडे फसवणुकीची तक्रार दाखल केली, इंटरपोलने सदर तक्रार सी.बी.आय.कडे वर्ग केली आणि चौकशी करण्याची विनंती केली.

या चौकशीच्या दरम्यान सी.बी.आय. ने मला त्यांच्या कार्यालयात बोलावले. कारण मीच बँकेत संबंधित कागदपत्रे हाताळली होती आणि मी विदेश विनिमय विभागाचा प्रमुख होतो. हे समन्स आल्यावर अर्थातच माझी हबेलंडी उडाली. कारण अशा प्रकारे सी.बी.आय. शी माझा संबंध येईल असे मला कधी वाटलेच नव्हते. मी ताबडतोब मुख्य कार्यालयाशी संपर्क साधला या अपेक्षेने की ते विचारपूस करतील , सर्व मॅटर समजावून घेतील, मला सी.बी.आय.ला कसे सामोरे जायचे त्याचे मार्गदर्शन करतील आणि जरूर वाटल्यास माझ्याबरोबर वरिष्ठ अधिकारी सी.बी.आय.ला पाठवतील. पण कसले काय ! मुख्य कार्यालयाने फक्त जुजबी माहिती घेऊन मला सी. बी. आय.ला जायला सांगितले, काहीही मार्गदर्शन न करता ! सी.बी.आय. ला जाणे तर भागच होते, दुसरा पर्यायच नव्हता. मी भीतभीत ठरलेल्या दिवशी, ठरलेल्या वेळी सकाळी १० वाजता सी.बी.आय. च्या ऑफिसात गेलो. गेल्या गेल्या मला एका खोलीत एकटे बसवण्यात आले आणि सांगण्यात आले की इथेच बसून रहा, काही वेळाने चौकशी अधिकारी येऊन चौकशी करतील. दहा मिनिटे झाली, पंधरा, वीस , तीस... एक तास, पण कुणीच येईना ! मी अस्वस्थ झालो. मग चौकशी अधिकारी आणि टायपिस्टने खोलीत प्रवेश केला. मग चौकशी सुरू झाली. चौकशी मी कस्टमरशी हात मिळवणी करून, वरकमाई करून, त्याला पैसे मिळवून दिले आहेत या अनुमानावर होत होती. अधिकाऱ्याने प्रश्न विचारायचा, मी उत्तर द्यायचे, अधिकारी सांगेल त्यानुसार टायपिस्टने हे संभाषण टाईप करायचे अशी पद्धत. अर्धा तास झाल्या झाल्या अधिकारी आणि टायपिस्ट, संभाषण अर्धवट सोडून बाहेर निघून गेले, मला मात्र बसून राहण्यास फर्मावले होते. मी मात्र खुर्चीवर बसूनच्या बसून ! ते दोघेही एक तासाने परत उगवले आणि पुन्हा चौकशी सुरू ! परत अर्ध्या तासाने ते दोघेही उठून गेले, मला बसवून ठेऊन ! असा प्रकार तीन चार वेळा चालू राहिला. बसून बसून अंग आंबले होते, मनातील धास्ती वाढत जात होती! पण सलग चौकशी होईच ना ! मी ENQUIRY ROOM मध्ये एकटा असताना शेजारच्या खोलीत दुसरी चौकशी पण चालू होती आणि मारहाणीचे आवाज ऐकू येत होते. त्यामुळे अर्थातच मी आणखी आणखी अस्वस्थ होत होतो. मग अकस्मात एक शिपाई आत आला आणि मला म्हणायला लागला,

'अहो , गुन्हा काबुल करून टाका. आम्ही तुम्हाला काही करणार नाही. दोषी पण धरणार नाही.' परंतु मी ठामपणे सांगितले की 'माझी काहीच चुकी नाही आणि मी गुन्हा कबुल करण्याचा प्रश्नच उदभवत नाही !'

या संदर्भातील बँकेची सगळी कागदपत्रे सी.बी.आय.ने अगोदरच ताब्यात घेतली होती. त्यातील काही बँकेच्या पत्रांवर माझी सही नव्हती. त्यांच्या खरेपणाबद्दल शंका घेतली गेली. मी तिथल्या तिथे सही करून ती कागदपत्रे प्रमाणित केली आणि शंकेला जागा ठेवली नाही . सरतेशेवटी चार साडेचारला चौकशी संपायला आली. मग सहज विचारतो असे दाखवून अधिकाऱ्याने अतिशय मऊ आवाजात विचारले, 'चौकशी संपल्यावर तू कुठे जाणार?' मी त्या दिवशी वॉशिंग मशीन खरेदी करणार होतो . त्याकरिता मी बँकेचे कर्ज पण घेतले होते. मी उत्तरलो, 'मी वॉशिंग मशीन खरेदी करणार आहे आणि त्याचा चेक द्यायला मी दुकानदाराकडे जाणार आहे.'

अधिकारी – 'वरकमाईतून तुम्ही असे व्हाईट गुड्स घेता वाटते?

मी – 'सर, मी त्याकरता बँकेतून कर्ज घेतले आहे. त्याचे प्रूफ दाखवतो पाहिजे असल्यास !'

अधिकारी – 'मग नंतर कुठे जाणार? कस्टमरला भेटून रिपोर्ट करायला?'

मग मात्र माझा तोल सुटला. मी वारंवार सांगूनही की बँक फक्त कागदपत्र हाताळते आणि माल कसा आहे याच्याशी बँकेचा काहीच संबंध नसतो, तरी सुद्धा तो अधिकारी, मी हातमिळवणी करून, वरकमाई करून कस्टमरला पैसे मिळवायला मदत केली, हे सोडायला तयारच नव्हता. मी रागाने बोललो, 'सर, एक काम करा, माझ्याबरोबर तुमचा शिपाई पाठवा. मी नंतर घरी जाणार आहे. तुमचा शिपाई माझ्या घरी येईल आणि माझे घर प्रत्यक्ष बघून त्याला कळेल की मी किती वरकमाई करतो ते! परत एकदा सांगतो, की माझी या व्यवहारात काही चूक नाही आणि मला कृपया यात गोवू नका !'

यानंतर मात्र अधिकारी वरमला, हसला. त्याने माझे टाईप केलेले स्टेटमेंट फाडून टाकले आणि मला सांगितले की 'तू निर्दोष आहेस, याची माझी खात्री झाली आहे. बिनधास्त जा. वॉशिंगमशीन खरेदी कर आणि मग घरी जाऊन बायको मुलांबरोबर टी.व्ही. बघत डिनर एन्जॉय कर !'

माझा जीव भांड्यात पडला. मी हसत हसत सी.बी.आय.च्या ऑफिसच्या बाहेर पडलो. प्रथम देवळात जाऊन देवाच्या पाया पडलो आणि मग दुकानदाराकडे आणि मग घरी !

ह्या प्रसंगातून मी तीन धडे घेतले, पहिला– आपली लढाई आपणच लढायची असते. उगाच दुसऱ्याकडून मदतीची अपेक्षा करणे चुकीचे, दुसरा– आपण बरोबर असलो तर कितीही दबाव आला तरी आपल्या म्हणण्यावर ठाम राहायचे. तिसरा–आपण सत्य असलो तर देव आपला हात कधीच सोडत नाही!

**– श्रीकांत शिंत्रे**

शब्दांकन : **सौ. ज्योत्स्ना शिंत्रे**

मोबा. ९९२००५८७०५


## योगवर्गाचे आयोजन

शिवाजी पेठ, मंगळवार पेठ, महाद्वार रोड, अंबाबाई मंदिर परिसरातील नागरिकांसाठी योग विद्याधाम, कोल्हापूर आणि कोल्हापूर चित्पावन संघ यांचे संयुक्त सहकार्याने कोल्हापूर चित्पावन संघ हॉल, गुरुमहाराज वाड्यानजीक, मिरजकर तिकटी, कोल्हापूर येथे रोज सकाळी ६ ते ८ या वेळेत योगासन वर्ग सुरू झाले आहेत. तरी इच्छुक योगसाधकांनी सदर वर्गाचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी खालील नंबरवर संपर्क साधावा.

**सौ. सिद्धी बकरे – 8275606627,**

**श्री. रोहित गवळी – 9657963475**

# मुलांचे पान



## » चित्र रंगवा




## » फरक ओळखा





## » ठिपके जोडून चित्र तयार करा





### शब्दप्रभुत्त्वाची साक्ष असलेल्या 'ज्ञानाच्या सोपानाची' जीवनगाथा

# ज्ञानसूर्याची सावली

## (लेखांक तिसावा)

११

या माधुकरीच्या प्रसंगानं एक मात्र झालं. आपल्याशी काहीसा अबोल असणाऱ्या सोपानाची ज्ञानधारणा किती पक्की आहे, किती सखोल आहे, याचा अंदाज निवृत्ती-ज्ञानेश्वराला आला आणि सोपानाचा संयम, समंजसपणा, समजावून सांगण्याची त्याची हातोटी, हे पाहिल्यावर आपला लहानगा भाऊ आता लहान राहिला नाही, मोठा झाला आहे, हे त्यांच्या लक्षात आलं. सोपानाकडे पाहण्याची त्यांची दृष्टीच बदलली. इतके दिवस 'सोपान लहान आहे, तो अजूनही अजाण आहे' असं ते दोघं म्हणत असत; पण या प्रसंगानं सोपानाची प्रगल्भता, त्याचं बुद्धिवैभव आणि समंजसता यांचा प्रत्यय आला. त्याने निवृत्ती-ज्ञानेश्वर अवाक झाले. सोपान हुशार आहे, बुद्धिमान आहे, एकपाठी आहे, हे ते जाणून होते; पण त्याच्या हुशारीची, बुद्धिवैभवाची त्यानं जी साक्ष दिली, ती अपूर्व होती. निवृत्ती-ज्ञानेश्वरांनी आता मात्र सोपानाच्या बाबतीत काही वेगळे संकल्प केले आणि आपण जे संकल्प केले, ते किती योग्य होते, याचा संकेत एका प्रसंगानं त्यांना मिळाला. त्यामुळे सोपानाच्या बुद्धिवैभवा बरोबरच त्याची आत्मिक उंची, आध्यात्मिक खोली आणि मनस्वी रुंदी याचा त्यांना प्रत्यय आला.

माधुकरीच्या प्रसंगानंतर एक दिवस निवृत्ती-ज्ञानेश्वर यांच्यात काही चर्चा झाली आणि एके दिवशी सकाळी-सकाळी, नव्हे भल्या पहाटेच जेव्हा सोपान जागा झाला, तेव्हा त्यानं पाहिलं, तर निवृत्तीदादा आणि ज्ञानादादा त्याच्या उशाशी बसले आहेत. डोळे चोळत तो उठून बसला. त्याला प्रथम वाटले आपण स्वप्न पाहतोय; पण पूर्ण जाग आल्यावरही 'ते दोघं इथं माझ्याजवळ का बसले आहेत?' सोपानाच्या मनात अनेक प्रश्न उभे राहिले. ते त्याच्या डोळ्यांत उमटले आणि चेहऱ्यावर उतरले. निवृत्ती-ज्ञानेश्वरांनीही त्याचा चेहरा वाचला. सोपान काही विचारणार, तोच, ''सोपाना, ऊठ, मुखप्रक्षालन करून ये. आज तुझ्याशी काही महत्त्वाचं बोलायचं आहे. म्हणूनच आज घाटावर न जाता आम्ही इथं थांबलो आहोत. ऊठ आता!''असं सांगून ज्ञानेश्वराने त्याला उठवलं. प्रश्नार्थक चेहरा तसाच ठेवून सोपान उठला. झोपडीच्या बाहेर गेला. डोणीतलं पाणी घेऊन त्यानं तोंड धुतलं. तोवर निवृत्ती-ज्ञानेश्वरही बाहेर आले होते. तिघंही अंगणात बसले. सोपानाच्या चेहऱ्यावर प्रश्नांना सोबत घेऊन उत्सुकता ओसंडत होती. निवृत्तीला गंमत वाटली. 'खरंतर याचं वय तसं अजाण म्हणावं असंच. आपल्यापेक्षा चार वर्षांनी लहान, म्हणजे असेल आठ-नऊ वर्षांचा. आई बाबा गेले, तेव्हा अवघा पाच-सहा वर्षांचा असेल; पण त्याही प्रसंगात याने मुक्तीला सांभाळण्याचं जे काम केलंय त्याला तोड नाही. ते अवघड काम मला आणि ज्ञानेशालाही जमलं नसतं. खरंतर तेव्हाच सोपन मोठा झाला होता; पण आपल्याच लक्षात यायला वेळ लागला.' निवृत्ती सोपानाकडे एकटक बघत होता. त्याच्या मनात हे विचार चालले होते. दादाच्या मनात काय चालले आहे, हे ज्ञानेश्वराच्या लक्षात आलं; पण सोपानाच्या डोक्यात असलेल्या प्रश्नांचा गोंधळ आणि मनाला लागलेली उत्सुकता यांमुळे त्याला कळेचना, की निवृत्तीदादा आपल्याकडे असं एकटक काय बघतोय? आणि या प्रश्नानं त्याच्या मनात आणखीच गोंधळ उडाला. आता मात्र ज्ञानेश्वराला त्याची दया आली.

''निवृत्तीदादा, आपण आज काय काय विषय बोलायचे आहेत रे?'' असा प्रश्न विचारून

ज्ञानेश्वरानं निवृत्तीला भानावर आणलं. मग मात्र निवृत्ती सावधला. सोपानाचा हात धरून त्याला आपल्या जवळ बसवून घेत निवृत्तीनं बोलायला सुरुवात केली. ''सोपान, अरे तू किती मोठा झालास? मी आणि ज्ञानेश्वर तुला अजून बालक समजत होतो; पण कालच्या द्वारकामाईंच्या प्रसंगात तू जो समंजसपणा दाखवलास, जे बुद्धिवैभव दाखवलंस ते खरंच अपूर्व होतं बघ ! आणि म्हणूनच आम्हाला कळलं की, आमचा सोपान आता मोठा झालाय ! समंजस झालाय ! खरंतर तू आई-बाबा गेले, तेव्हाच समंजस; शहाणा झाला होतास. म्हणूनच चिमुरड्या मुक्तीला सांभाळण्याचं अवघड काम तू केलंस, पण आम्हाला मात्र ते आता समजलं. म्हणून सोपाना आता काही गोष्टी, काही विषय तुझ्याजवळ बोलायचे आहेत. तुझा सल्ला घ्यायचा आहे. तुला सांगायचं आहे. म्हणून आज आम्ही मुद्दाम थांबलो आहोत.'' निवृत्तीचं बोलणं ऐकून सोपान संकोचला. इतकी स्तुती, इतकी प्रशंसा ऐकायची त्याला सवय नव्हती. 'आला दिवस आपला म्हणायचा. नेमून दिलेलं काम मन लावून करायचं आणि आपलं आपण अध्ययन करायचं,' असं त्याचं एकव्रती काम चाललेलं असायचं. यात मध्येमध्ये खंड पडायचा तो मुक्तीशी होणाऱ्या लुटूपुटूच्या भांडण्यामुळे. त्यामुळे निवृत्तीदादांच्या तोंडून आपली प्रशंसा ऐकून सोपान संकोचला. लाजला. हळूच म्हणाला, ''दादा, माझा सल्ला तुम्ही घ्यावात, एवढी माझी योग्यता नाही. ती तुम्ही मानता, हा तुमच्या मनाचा मोठेपणा आहे. तुम्ही आज्ञा करायची आणि मी ती पाळायची, एवढंच मला माहीत आहे. आताही तुम्ही आज्ञा करावी. मी ती अंमलात आणेन; पण मला सल्ला वगैरे विचारायचे तुम्ही म्हणू नका. मला संकोचल्यासारखं होतं !'' सोपानानं संकोचतच सांगितलं. तो सारा संकोच त्याच्या अवघ्या देहबोलीतून दिसत होता.

निवृत्तीच्या चेहऱ्यावर स्मितहास्य पसरलं. ज्ञानेश्वरही सोपानाच्या या विनम्रतेनं आनंदित झाला. निवृत्तीनं सोपानाच्या हातावर थोपटलं. त्याच्या केसातून मायेनं हात फिरवला. निवृत्तीला क्षणभर गलबलून आलं, तर सोपानाला मात्र त्या स्पर्शातून जणू आई सापडली, आई आठवली, आई दिसली. सोपानाचे डोळे भरून आले. अश्रू गालांवरून वाहू लागले. ज्ञानेश्वरही गहिवरला. सोपानाचा घायाळ चेहरा बघून निवृत्तीला राहवलं नाही. त्यानं सोपानाला आवेगानं मिठीत घेतलं. ज्ञानेश्वरालाही जवळ ओढलं आणि आज कितीतरी दिवसांनी, कितीतरी दिवसांनी तिन्ही भाऊ एकमेकांच्या मिठीत विसावले. तिघांचेही चेहरे एकमेकांच्या चेहऱ्यांजवळ होते. गाल एकमेकांना चिकटले होते. तिघांच्याही डोळ्यांतून वाहणारे अश्रू गंगा-यमुना-सरस्वती बनून वाहत होते. भारत वर्षातल्या या तीन पवित्र नद्या; पण आज या तिघांच्या डोळ्यांतून वाहताना त्या तिघींनाही धन्यता वाटली. तिघेही जण एकमेकांना आधार देत होते. एकमेकांच्या स्पर्शातून एकमेकांची मनं जाणून घेत होते, भावना ओळखत होते. आपण तिघंही जण एकमेकांजवळ आहोत, एकमेकांच्या कुशीत आहोत, मिठीत आहोत ही भावनाच फार मोठं काम करून जात होती. एरवी काहीशा गांभीर्यानं वागणारा, लहान वयातच मोठी जबाबदारी पडल्यामुळे सतत विचारात असणारा निवृत्ती, आई-वडिलांना घ्याव्या लागलेल्या देहान्त प्रायश्चित्तामुळे घायाळ मनानं वावरणारा, आई-बाबांचे सारे संकल्प सिद्धीस न्यायचे, या विचारानं भारलेला आणि सतत त्याच विचारात असणारा ज्ञानेश्वर आणि या दोघांपासून काहीसा वेगळा, काहीसा अलिप्त, वयानं लहान; पण सतत ज्ञानाच्या परिपूर्णतेचा ध्यास घेणारा सोपान, ही तिघं भावंडं आज एकमेकांच्या कुशीत विसावली होती.

नेहमीप्रमाणे मुक्ताला जाग आली. झोपडीत शांतता होती. तिला नवल वाटलं. 'आज सोपानदादाच्या पाठांतराचा, मंत्रोच्चाराचा आवाज कसा येत नाही. की सोपानदादा कुठे बाहेर गेला? माधुकरी मागायला? म्हणजे आपल्याला उठायला आज इतका उशीर झाला? मुक्ता चटकन उठली. डोळे चोळून सभोवार बघितलं. झोपडीत कुणीच

नव्हतं. कपाळावरचे केस मागे सारत मुक्ता उठली. फाटकी गोधडी, पालपट तिनं घडी केलं आणि तोंड धुवायला बाहेर आली; पण हे काय? बाहेर अजून झुंजूमुंजूच होतं. पुरतं म्हणण्यापेक्षा फारसं उजाडलेलंही नव्हतं. 'म्हणजे आपल्याला उठायला उशीर झालेला नाहीय. नेहमी या वेळी सोपानदादा श्लोक म्हणत असायचा. मग आज कुठे गेला?' मुक्ताची भिरभिरी नजर सोपानाला शोधत होती. रोज पहाटे उठल्यावर सोपानच तर तिच्या समोर, तिच्या समवेत असायचा. त्यामुळे रोज डोळे उघडता क्षणी तिला एकतर सोपान दिसायचा किंवा त्याचे मंत्रोच्चार तरी ऐकू यायचे. मुक्ता प्रसन्न मनानं उठायची; पण आज? आज ना सोपान दिसला होता, ना त्याचा आवाज ऐकू येत होता. 'मग गेला कुठे हा असा? की... की... आई-बाबांसारख्या... हा... ही...!!!' मुक्तीच्या हृदयाचा ठाव सुटला. तिच्या डोळ्यांत पाणी भरायला लागलं.

तोच तिची नजर झोपडीच्या बाहेर जरा एका बाजूला गेली. तिथे उंबराचं झाड होतं. त्याच्या खाली तिला काही हालचाल दिसली, म्हणून तिने नजर वळवली, तर काय? साक्षात ब्रह्मा, विष्णू, महेश! होय साक्षात ब्रह्मा-विष्णू-महेश तिथं होते ! तिघांचे चेहरे एकमेकांच्या अगदी जवळ, अगदी गालाला गाल चिकटल्यासारखे. तिघांच्या चेहऱ्यांभोवती तेजोवलयाची प्रभावळ, तिघांचे नेत्र मिटलेले, तिघांच्याही चेहऱ्यावर एक प्रसन्न हास्य. ब्रह्मदेवाच्या कपाळावर ᘓ असं ओंकार गंध, विष्णूच्या कपाळावर ⊍ असं उभं गंध, तर महेशाच्या कपाळावर ≋ अशी आडवी विभूती रेखलेली.

त्या उंबराच्या झाडाभोवती एक मंद सुवास दरवळत होता. दोन गोमाता त्या ठिकाणी चरत होत्या. मुक्तीची निरीक्षक नजर सगळीकडे फिरत होती; 'पण हे काय? तिघांचे चेहरे ब्रह्मा-विष्णू-महेश आहेत, तर असली जुनी-विटकी वस्त्रं का घातलीत यांनी?' असा प्रश्न मुक्ताच्या मनात उभा राहिला आणि तिला एकदम ओळख पटली. 'अंगबाई, हे तर माझे तीन भाऊ! निवृत्तीदादा, ज्ञानादादा आणि सोपानदादा! पण मग यांचे चेहरे असे... असे का दिसताहेत? मुक्ता घाबरली. तिला हुंदका फुटला. 'माणूस मेला की देवाकडे जातो! मग हे तिघं असे देवांसारखे का दिसताहेत?' मुक्ताच्या मनात प्रश्नांचा गोंधळ माजला. त्या गोंधळानं तिला विद्ध केलं आणि हुंदके देतच ती त्या उंबराकडे धावली आणि निवृत्तीच्या मांडीवर कोसळली. तिच्या अशा एकदम येऊन पडण्यानं या तिघांची लागलेली भावसमाधी भंग पावली. मुक्ता येऊन मांडीवर पडली आहे आणि त्यातच ती रडते आहे, हे बघून निवृत्तीनं दोन्ही भावांना आपल्या मिठीतून बाजूला केलं आणि मुक्ताला उठवून आपल्या कुशीत घेऊन तिच्या डोळ्यांतलं पाणी पुसलं.

मुक्तानं पाहिलं- तिचा निवृत्तीदादा, तिचा नेहमीचा निवृत्तीदादा, नेहमीचा ज्ञानादादा आणि नेहमीचा सोपानदादा तिला दिसला. तिनं एकदम निवृत्तीला गळामिठी घातली आणि जोराजोरात हुंदके द्यायला लागली. तिघांनाही कळेना हिला असं रडायला काय झालं? तिचं आणि सोपानाचं चांगलं गुळपीठ होतं. सोपानानं निवृत्तीच्या गळ्यातली तिची मिठी सोडवली आणि तिला जवळ घेऊन विचारलं, ''मुक्ता, ए वेडाबाई, अगं असं हुंदके देऊन रडायला काय झालं? आत्ताच तर उठलीस ना? मग कुठं पडलीस का? की काही वाईट स्वप्नं पाहिलंस? मुक्ते, छकुले, सांग गं काय झालं ते? का अशी रडत आहेस?'' सोपानाचं बोलणं ऐकून मुक्तीनं त्याचा हात धरला आणि म्हणाली, ''मग... मग तुम्ही तिघं असे कसे दिसत होता? गालाला गाल चिकटल्यासारखे आणि तुमचे तिघांचे चेहरे ब्रह्मा-विष्णू-महेशासारखे का दिसत होते? मला वाटलं... मला वाटलं... की... की... तुम्ही तिघंपण... तिघंपण... देवाकडे गेलात. गेलात... मला सोडून... आई... बाबा गेले... तसे! म्हणून... म्हणून मला रडू आलं... !!'' म्हणत मुक्तीनं पुन्हा हुंदका दिला.

(क्रमश:)

**– सौ. मंजुश्री गोखले,** मो. ८८०५३५५२००

# सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी'

ज्ञानेश्वरांनी श्रीमद्‌भगवद्‌गीतेवरील भाष्य ज्ञानेश्वरीद्वारा लिहून या महान ग्रंथराजाचा सर्वसामान्यांना परिचय करून दिला हे आपण जाणतो. मात्र ज्ञानेश्वरांपाठोपाठ त्यांचे धाकटे बंधू सोपानदेवांनीही अतिशय सोप्या भाषेत गीतेचा ओवीबद्ध अर्थ सांगितला आहे हे किती लोक जाणतात? गीतेच्या ७०० श्लोकांचे निरूपण ज्ञानदेवांनी सुमारे ९०३२ ओव्यांतून केले आहे. तर सोपानदेवांनी ते अवघ्या ७०४ ओव्यांतून आणि नागर मराठी भाषेत केले आहे. नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी सोपानदेवी संपादित केली असून आपण ती क्रमश: वाचत आहोत. यात ठळक टाईपात सोपानदेवांची रचना असून त्याखाली विनोबांनी केलेली गीताईतील रचना दिली आहे. **– व्यवस्थापक**

**अध्याय ४ : कर्म ब्रह्मार्पण योग**

**श्रीभगवानुवाच ।**
**जरी अत्यंत पापे असती । ते आचरलिया ज्ञानस्थिती ।**
**तयातेंहि स्वर्ग प्राप्ति । इहलोकी दु:ख कैचे ।।**
जरी पाप्यांमध्ये पापी असशील शिरो-मणि ।
तरी ह्या ज्ञान-नौकेनें पाप तें तरशील तूं ।।३६।।

**जैसे काण्ठभार इंधन । भस्म होय अग्निसंगी आपण ।**
**तैसे सर्व कर्म अर्जुना जाण । दग्ध होय ज्ञानाग्नीनें ।।**
संपूर्ण पेटला अग्नि काष्ठें जाळूनि टाकितो ।
तसा ज्ञानाग्नि तो सर्व कर्मे जाळूनि टाकितो ।।३७।।

**तरी ज्ञानासारिखें पवित्र । आणि नाहीं गा सर्वत्र ।**
**त्या ज्ञानासी योग करिताती निरंतर ।**
**ज्ञाने करूनि ब्रह्म पाविजे ।।**
ज्ञानासम नसे कांहीं पवित्र दुसरे जगीं ।
योग-युक्त यथा-काळीं तें पावे अंतरीं स्वयें ।।३८।।

**ज्ञान पाविजे भक्ति करूनी ।**
**इंद्रिये नेमिजे तत्पर होउनी ।**
**ज्ञान निष्ठेने पाहोनी । शांति तात्काळ पाविजेल ।।**
श्रद्धेनें मेळवी ज्ञान संयमी नित्य-सावध ।
ज्ञानानें शीघ्र तो पावे शांति शेंवटची मग ।।३९।।

**ज्ञान आणि भक्तिहीन ।**
**तो संशयात्मक पावे आपण।**
**तया इहलोक पर नाही जाण ।**
**संशयात्मक सुख कैंचें ।।**
नसे ज्ञान नसे श्रद्धा संशयी नासला पुरा ।
न हा लोक न तो लोक न पावे सुख संशयी ।।४०।।

**योगे टाकी कर्माते । ज्ञाने नाशी संशयाते ।**
**आत्मकर्मी वर्तता तयाते । तो न बाधे धनंजया ।।**
यागानें झाडिलीं कर्मे ज्ञाने संशय तोडिले ।
जो सावधान आत्म्यांत कर्मे त्यास न बांधिती ।।४१।।

**या कारणे हे ज्ञान । हृदयी नुपजे संशय करून ।**
**ज्ञान शस्त्रे संशय तोडून ।**
**कर्म अंगिकारूनी उठे अर्जुना ।।**
म्हणूनि अंतरांतील अज्ञान-कृत संशय ।
तोडुनी ज्ञान-खड्गानें ऊठ तूं योग साधुनी ।।४२।।

इति श्रीमद्‌भगवद्‌गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां
योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे कर्मब्रह्मार्पणयोगे ।
नाम चतुर्थो:ध्याय: ।
श्रीकृष्णार्पणमस्तु ।।

**वाचकांनी आपले बदललेले पत्ते चित्पावन संघाच्या कार्यालयात किंवा ७६२०५४६२२५ या व्हॉटस् ॲप क्रमांकावर लौकरात लौकर पाठवावेत.**

### मधूर आवाजाचे आणि सोज्वळ सौंदर्याचे मूर्तिमंत प्रतिक असलेल्या

# सुमन कल्याणपूर



गोड आवाजाचे नि सोज्वळ सौंदर्याचे मूर्तिमंत प्रतिक असलेल्या **सुमन कल्याणपूर** यांचा नुकताच ८७ वा वाढदिवस झाला! त्यांना खूप खूप शुभेच्छा!

सुमनताईंचा जन्म २८ जानेवारी १९३७ साली ढाक्का येथे झाला. वडील शंकरराव हेमाडी सेंट्रल बँक ऑफ़ इंडिया मधे मोठ्या हुद्यावर होते. तसे हे कुटुंब मूळचे मेंगलोर, कर्नाटक येथील सारस्वत ब्राह्मण. ढाका येथील वास्तव्यात आर सी बोराल, के सी डे, के एल सैगल, कानन बाला यांच्या गाण्याचा त्यांच्यावर प्रभाव होता. तसचं सचिन देव बर्मन यांचे लोक संगीत, बंगाली गाणी, रविंद्र संगीत त्या खूप ऐकायच्या.

१९४२ मध्ये हे कुटुंब मुंबईला आले. सुमनताईंच्या चित्रकला आणि संगीत या दोन कला खूप आवडीच्या. सुरुवातीला प्रभातचे केशवराव भोळे यांच्याकडे त्या संगीत शिकू लागल्या. सेंट कोलंबा हायस्कूल मधे शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी जे जे स्कूल आफ आर्टस मधे प्रवेश घेतला. पण जेव्हा संगीत हे फक्त आवड म्हणून नाही, तर त्यातंच करीयर करायचं असं ठरल्यावर त्या उस्ताद खान, अब्दुल खान आणि गुरु मा.नवरंग यांच्याकडे व्यावसायिकदृष्ट्या शास्त्रीय संगीताची तालीम घेऊ लागल्या. प्रथम जरी हौस, आवड म्हणून गाणं शिकलं तरी बाहेर जाहीर कार्यक्रम करायला घरून बंदी होती. पण जेव्हा १९५२ साली ऑल इंडिया रेडियो कडून गायची संधी आली तेव्हा मात्र त्यांनी ती सोडली नाही.

१९५३ मधे शुक्राची चांदणी ह्या मराठी चित्रपटात एक गाणं म्हटलं. तेव्हाच शेख मुख्तार मंगू नावाचा चित्रपट बनवत होते. संगितकार होते महंमद शफी... त्यांची सुमनजींबरोबर ३ गाणी संगीतबध्द झाली आणि निर्मात्या बरोबर काही वाद झाल्याने शफी चित्रपट सोडून गेले आणि त्यांच्या जागी ओ पी नय्यर आलें. त्यांनी त्यातलं एकच गाणं चित्रपटात ठेवलं ते 'कोई पुकारे धीरेसे' हे अंगाईगीत होतं. नंतर १९५४ साली दरवाजा चित्रपटासाठी सं. नाशाद यांनी त्यांची ५ गाणी संगीतबध्द केली.

खरं तर 'मंगू' हा त्यांचा साईन केलेला पहिला चित्रपट पण निर्मात्या ईस्मत चुगताई आणि दिग्दर्शक शाहिद लतीफ यांचा दरवाजा पहिला रिलीज झाला. एका concert मध्ये तलत मेहमूद यांनी सुमनजींचे गाणे ऐकले. नवीन कलाकार असूनही त्यांची गाण्याची तयारी एवढी चांगली होती की त्यांच्या बरोबर गाणं गायची इच्छा त्यांनी बोलून दाखवली. ती संधी सुध्दा एवढ्या लवकर येईल असे सुमनजींना वाटले नव्हते. ह्याच चित्रपटात तलत मेहेमूद यांच्या बरोबर त्यांचे एक ड्यूएट आहे. 'एक दिल दो है तलबगार बडी मुश्कील है!'

याच वर्षी आलेल्या 'आरपार' चित्रपटात 'मुहब्बत करलो जी करलो अजी किसने रोका है' या

गाण्यात त्यांनी दुसऱ्या अंतऱ्याच्या दोन ओळी आणि कोरसमध्ये गायलयं. बस! ओ.पीं.साठी त्यांचे हे पहिले आणि शेवटचे गाणे!

त्यानंतर साठच्या दशकात त्यांना मिया बीबी राजी, बात एक रातकी, दिल एक मंदीर, दिल ही तो है, साथी, दिलने फिर याद किया, शगुन, राजकुमार, ब्रह्मचारी, जहांआरा अशा चांगल्या बॅनरच्या चित्रपटात शंकर जयकिशन, रोशन, मदन मोहन, सचिन देव बर्मन, सोनिक ओमी, हेमंत कुमार आणि लक्ष्मीकांत प्यारेलाल अशा सर्व नामांकित संगीतकारांकडे गाण्याची संधी मिळाली. त्यात शंकर जयकिशन आणि रोशनजींबरोबर त्यांनी सर्वात जास्त काम केलयं!

हिंदीप्रमाणेच मराठीतसुध्दा सुमनताईंनी असंख्य गाणी गायली. त्यात चित्रपटांपेक्षा भावगीते आणि भक्तीगीतांची संख्या अधिक आहे. त्यांना पहिलं चित्रपट गीत गायची संधी 'पसंत आहे मुलगी' ह्या चित्रपटात सं. वसंत प्रभू यांनी दिली. त्यानंतर एकटी, पुत्र व्हावा ऐसा, अन्नपूर्णा, मोलकरीण, मानिनी इ. चित्रपटातली सुमनजींची गाणी खूपच गाजली. त्यांची इतर भाषांतील विशेषतः बंगाली गीते पण खूप प्रसिध्द आहेत. त्यांनी मराठीत सुधीर फडके, दशरथ पुजारी, अशोक पत्की, कमलाकर भागवत यांच्या बरोबर जास्त काम केलं. दशरथ पुजारीं बरोबरची सगळीच भक्तिगीते फारचं प्रसिध्द आहेत.

१९५८ साली सुमनताईंचं श्री रामानंद कल्याणपूर यांच्याशी लग्न झालं. सासर कडूनही त्यांच्या गाण्याला नेहमी प्रोत्साहन मिळालं. त्यांना चारुल अग्नी ही मुलगी आहे जी लग्नानंतर अमेरिकेत रहाते. त्यांची नात आयेशानी मुंबईत सुमनजींच्या नावाने NGO चालवते.

लताजींबरोबर सुमनताईंनी एकमेव युगलगीत गायलं ते १९५९ साली आलेल्या चांद ह्या चित्रपटात, हेमंत कुमार ह्यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली! 'कभी आज, कभी कल, कभी परसो, ऐसेही दिन बीते बरसो, हमारी सुनते ही नहीं साजना, देखोजी सुनते ही नहीं साजना' लताजींबरोबर गायचं म्हणून त्यांना खूप टेंशन आलं होतं पण हेमंतदा त्यांना म्हणाले, 'जरुरीपेक्षा वरच्या स्वरात गाऊ नको आणि लताजींना अजिबात फॉलो करू नको. तू तुझ्या पध्दतीने गा !'

असं म्हणतात की, रेडियो सिलोनवर जेव्हा त्यांची गाणी प्रस्तुत व्हायची तेव्हा या दोघींच्या आवाजातील साधर्म्यामुळे निवेदकाचा गायिकेच्या नावात खूप गोंधळ होई. आणि गाणं सुमनजींच असलं तरी कधी कधी गायिका लता मंगेशकर असं सांगितलं जाई. 'न तुम हमे जानो न हम तुम्हे जाने' या गाण्याच्या वेळी तर लोक मानेनात की ते गाणं लताजींचं नाही आहे. ग्रामोफोन रेकार्डवर सुध्दा चुकीचे नाव छापले जाई. पुढे पुढे कन्फ्युजन असेल तेव्हा निवेदक गायिकेचं नाव सांगतच नसत. अर्थात सुमनजींवर त्याचा काही परिणाम झाला नाही. त्या आपले काम चोख करत राहिल्या. स्वतः सुमनजी नेहमी सांगतात की कॉलेजच्या दिवसात त्यांच्यावर लताजींच्या आवाजाचा खूप प्रभाव होता.

६० च्या दशकात रॉयल्टी वरून वाद झाल्याने काही वर्ष लताजी रफीजींबरोबर गात नव्हत्या. त्यामुळे सहाजिकच संगीतकारांनी ती गाणी सुमनजींकडून गाऊन घेतली. लताजी खूप बिझी असत तेव्हाही ते सुमनजींकडून गाऊन घेत. त्याच दरम्यान दोघांची १४० ड्यूएटस आहेत. त्यातली काही गाजलेली....

- अगर तेरी जलवा नुमाई न होती
- अजहूं न आए बालमा सावन बीता जाए
- तुमने पुकारा और हम चले आए
- आजकल तेरे मेरे प्यारके चर्चे हर
- परबतोंके पेडोंपर शामका बसेरा है
- ना ना करते प्यार तुम्हीसे कर बैठे
- मेरा प्यार भी तू है ये बहार भी तू है

साम टी व्ही वरच्या एका मुलाखतीत स्वतः सुमनजींनी हे सांगितलय म्हणून या गोष्टीचा उल्लेख करावासा वाटतो. १९६४ साली ए मेरे वतनके लोगो

हे सुप्रसिध्द गाणं नेहरुंसमोर सुमनताई म्हणणार होत्या. तशा तालमी पण झाल्या होत्या. पण आयत्यावेळी त्यांना सांगण्यात आलं की हे गाणं तुम्हाला गाता येणार नाही तुम्ही दुसरी गाणी म्हणा. त्यांना हे खूप धक्कादायक होतं. त्या म्हणतात की मला अजूनही कळलं नाही की ते गाणं माझ्याकडून कां काढून घेण्यात आलं? हे लिहिण्यामागे सुमन ताईंची GENUINE खंत जाणवली ती मांडणं एवढाच उद्देश आहे. जेव्हा HMV ने ५० बेस्ट प्रेमगीतांचा समावेश असलेल्या चार कॅसेटस काढल्या होत्या तेव्हा त्यामध्ये त्यांची ७ गीतं होती. पण कॅसेटवर सुमनजींशिवाय सर्व प्रमुख गायकांचे फोटो होते.

५० आणि ६० च्या दशकात तर लताजी आणि आशाजींचच वर्चस्व होते. पण तरीही सुमनजींनी आपले अस्तित्व टिकवले. त्या स्पर्धेतही मागे न पडता स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. लताजींच्या आवाजाशी विलक्षण साम्य असून कधीही त्यांची कॉपी केली नाही. त्यांना 'सूर सिंगार संसद' हा सन्माननीय पुरस्कार तीन वेळा मिळाला. ग दि माडगूळकर पुरस्कार मिळाला पण दुर्दैवाने कोणताही चित्रपट पुरस्कार मिळाला नाही, अगदी तोडीची गुणवत्ता असूनही याचे खूप वाईट वाटते.

मी ९ वी किंवा १०वी त असेन त्यावेळी! माझ्या खूप जवळच्या मैत्रिणीमुळे सुमनताईंना प्रत्यक्ष बघण्याचा योग आला होता. तेव्हा एवढी समजही नव्हती पण अजून त्यांची गोड हसरी मूर्ती माझ्या डोळ्यासमोर आहे. त्यांचा ८० व्या वाढदिवसानिमित्त मुंबईच्या षण्मुखानंद हॉलमधे कार्यक्रम झाला तेव्हा त्यांनी काही गाणी म्हटली. 'न तुम हमें जानो, ना हम तुम्हे जाने', 'ठहरिये होशमें' आवाजात तोच गोडवा, कंपन नाही, थरथर नाही. खरचं दैवी देणगी आहे. सुमनताईंना परमेश्वराने दीर्घ आणि निरोगी आयुष्य द्यावे ही प्रार्थना!

सुमनजींची काही निवडक सुंदर गाणी... जरूर ऐका. ओळखीचे वाटत नसेल तर यू ट्यूब वर ऐका. खूप छान आहेत.

**Duet songs...**

- मनमोहन मनमें हो तुम्ही मोरे अंगअंगमें तुम ही समाए
- अजहूं ना आए बालमा सावन बीता जाए
- बहारोंसे पूछो नजारोंसे पूछो
- आजकल तेरे मेरे प्यारके चरचे हर जबानपर
- तुमने पुकारा और हम चले आए
- रात सुहानी जाग रही है धीरे धीरे चुपके चुपके चोरी चोरी हो
- तुमसे ओ हसीना ये दिलकी हालत न मैंने करनी थी
- ना ना करते प्यार तुम्हीसे कर बैठे
- ठहरिये होशमें आ लूं तो चले जाईयेगा
- दिल एक मंदीर है प्यारकी जिसमें होती है पूजा ये प्रीतम का घर है
- दिलने फिर याद किया बर्क सी लहर आयी है
- रहे ना रहे हम महका करेंगे (हे गाणे solo लताजीं च्या आवाजात आहे)
- चुरा ले न तुमको ये मौसम सुहाना खुली वादियोमें अकेली न जाना
- गरजत बरसत सावन आयोरे
- आया न हमको प्यार जताना प्यार तुझीसे हम करते है
- परबतोंके पेडोंपर शामका बसेरा है
- कितना है तुमसे प्यार मुझे मेरे राजदार
- आपसे हमको बिछडे हुए एक जमाना बीत गया
- ऐसे न कहो बात के मर जाए कहीं हम
- के जां चली जाए जिया नहीं जाय
- तुझे प्यार करते है करते रहेंगे
- दिले बेताब को सीनेसे लगाना होगा
- दिलकी किताब कोरी है
- तुझे देखा तुझे चाहा तुझे पूजा मैंने
- तू जंगल की मोरनी ते मैं बागादा मोर
- ये किसने गीत छेडा दिल मेरा नाचे थिरक थिरक
- मेरा प्यार भी तू है ये बहार भी तू है
- जबसे हमतुम बहारोमें, खो बैठे तुम नजारोमें

- न जाने कहां तुम थे न जाने कहां हम थे
- तुम जो आओ तो प्यार आ जाए
- ये दिन दिन है जिंदगीके आजारे आजा मेरे साथी
- तुम्हे दिलसे चाहा तुम्हे दिल दिया है
- ये परबतोंके दायरे ये शामका धुआं
- तुझे प्यार करते है करते रहेंगे के दिल बनके दिलमें धडकते रहेंगे

**Solo songs....**

- न तुम हमें जानो न हम तुम्हे जाने
- मेरे मेहेबूब न जा आजकी रात न जा
- अल्ला तू करम करना मौला तू रहम करना
- हाले दिल उनको सुनाया न गया
- चले जा चले जा चले जा ज प्यार मिले
- कोई गीत सुहाना मेरे संग गा गुनगुना
- जुही की कली मेरी लाडली
- छोडो छोडो मोरी बैंया सांवरे
- शराबी शराबी ये सावन का मौसम
- फुलवा बन महके देखो लहके डाली डाली
- छोडो छोडो मोरी बैया सावरे
- दिल गम से जल रहा है पर धुआं ना हो
- यूंहीं दिलने चाहा था रोना रुलाना
- ना जाने कैसे पलमें बदल जाते है
- अखियोंका नूर है तू अखियोंसे दूर है तू
- फिर भी पुकारे चले जाएंगे
- डारी की डारी तेरी डार कल है इतवार के मुन्ना जाएगा बाजार
- ना जाने कैसे पलमें बदल जाते हैं

**निवडक मराठी गाणी...**

- जिथे सागरा धरणी मिळते
- इथून दृष्ट काढते निमिष एक थांब तू
- उमा म्हणे अग्नी माझे जळाले माहेर
- पिवळी पिवळी हळद लावली
- झिमझिम झरती श्रावणधारा
- शब्द शब्द जपून ठेव बकुळिच्या फुलापरी
- ओंकार प्रधान रूप गणेशाचे
- जिथे सागरा धरणी मिळते
- भक्तीच्या फुलांचा गोड तो सुवास
- केतकीच्या बनी तिथे नाचला ग मोर
- मृदुल करांनी छेडित तारा
- सावळ्या विठ्ठला तुझ्या दारी आले *श्रीरामाचे चरण धरावे
- अरे संसार संसार जसा तवा चुल्यावर
- देवा दया तुझी की ही शुध्द दैव लीला
- असावे घरटे अपुले छान
- जगी ज्यास कोणी नाही त्यास देव आहे
- गेला सोडून मजसी कान्हा
- जेथे जातो तेथे तू माझा सांगाती
- वाट इथे स्वप्नातील संपली जणू
- घाल घाल पिंगा वाऱ्या माझ्या परसात

**– कृपा देशपांडे, पुणे.**

**– बोडण सोहळा –**

**आपल्या समाजाचा कुलाचार म्हणजे बोडण सोहळा !**

**यावर्षी संस्थेतर्फे सार्वजनिक बोडण सोहळा शनिवार, दि. १७ मार्च २०२३ रोजी संस्थेचे 'रमा–दामोदर सभागृह' येथे करणेचे ठरवत आहोत. बोडणाची सर्व व्यवस्था संस्थेतर्फे करणेत येणार असून खर्च प्रतिबोडण रु. ३५००/– इतका व एक जादा पान जेवण रु. २५०/– इतका येईल. (एका बोडणास ४ सवाष्ण व १ कुमारिका )**

**संपर्क : कोल्हापूर चित्पावन संघ, मंगळवार पेठ, कोल्हापूर. फोन : ०२३१-२५४६२२५**

**श्रीमती वासंती लिमये : ९१५८८५९६०३ * सौ. संगीत आपटे : ८१४९५८००३४**

# मुस्लिम स्त्री कलाकार
## जोहराबाई अंबालेवाली

या लेखमालेतील तिसरी कलाकार आहे, जोहराबाई अंबालेवाली. जोहराबाई ही शास्त्रीय गायनासाठी प्रसिद्ध होती. त्याचप्रमाणे ती हिंदी चित्रपटांची पार्श्वगायिका म्हणूनही प्रसिद्ध होती.

जोहराबाईंचा जन्म १९१८ साली हरयाणा राज्यातील अंबाला येथे झाला. जोहराबाई वयाच्या १३ व्या वर्षीच ऑल इंडिया रेडिओवर गायला लागली. एच.एम्.व्ही. ने जोहराबाईंच्या ठुमरी गायनाच्या रेकॉर्डस् काढल्या.

१९३३ साली आलेल्या 'डाकू की लडकी' या सिनेमापासून तिने पार्श्वगायन करण्यास सुरुवात केली. त्या सिनेमाचे संगीत प्राणसुख नायक या संगीतकाराने दिले होते. सुरुवातीची काही वर्षे तिने लाहोर येथे चित्रपटसृष्टीत पार्श्वगायन केले. त्यानंतर ती मुंबई येथे आली.

१९४४ साली 'रतन' हा सिनेमा प्रदर्शित झाला. त्या सिनेमात तिने गायलेली गाणी खूपच गाजली आणि जोहराबाई प्रसिद्धीच्या झोतात आली. 'आखिया मिलाके जिया भरमाके', 'परदेसी बालमा', 'रुमझुम बरसे' ही तिने म्हटलेली गाणी खूप लोकप्रिय झाली. अजूनही त्या गाण्यांची गोडी अवीट आहे. या सिनेमाला संगीतकार नौशाद यांनी खूप सुंदर संगीत दिले आहे. त्यानंतर १९४६ साली 'अनमोल घडी' हा सुपरहीट सिनेमा आला. त्यालाही 'नौशाद' यांचेच संगीत आहे. 'उडनखटोले पे उड जाऊ' हे गाणे जोहराबाईने शमशाद बेगम बरोबर म्हटले आहे. ते गाणेसुद्धा खूप गाजले.

१९४८ साली 'मेला' हा नौशादचे संगीत असलेला सिनेमा आला. त्यात 'शायद वो जा रहे है छुपकर मेरी नजरसे' हे जोहराबाईचे गाणे खूप गाजले.

जोहराबाई हिचा आवाज कडक व धारदार असा होता. ती गाणं थोडसं नाकात म्हणत असे. शमशाद बेगम ही जोहराबाईंच्या स्टाईलमध्ये गात असे.

१९४५ साली आलेल्या 'झीनत' या सिनेमात जोहराबाईने नूरजहाँ आणि कल्याणी यांच्याबरोबर म्हटलेली एक कव्वाली खूपच गाजली होती. ती कव्वाली म्हणजे 'आहे ना भरी शिकवे ना किये'. हिंदी चित्रपटात स्त्रीच्या आवाजात गायलेली ही पहिली कव्वाली.

१९४८ साली 'लता, आशा आणि गीता' या गायिका आल्यावर या जुन्या गायिकांची सद्दी हळूहळू संपत आली.

जोहराबाईने एकूण १८ सिनेमांत पार्श्वगायन केले. यापैकी 'गीत' (१९४४), 'रतन' (१९४४), 'झीनत' (१९४५), 'सोहनी महिवाल' (१९४६) आणि 'महल' (१९४९) या चित्रपटांनी आपली छाप चित्रपटसृष्टीवर उमटवली व हिंदी चित्रपटसृष्टी समृद्ध केली.

अशी ही गुणी गायिका २१ फेब्रुवारी १९९० या दिवशी अनंतात विलीन झाली.

**– प्रकाश गानू,**
मोबा. ९४२१९२९८४७

सोने-चांदी मौल्यवान खरेदी !
गोखले ब्रदर्स
सराफी दुकान
बुधवार, दि. 20 : पुष्य नक्षत्र
आपलं दुकान
महाद्वार रोडवर,
0231–2546585

# काय आहे आपल्या देशातील राज्यांच्या नावामागील लॉजिक? जाणून घ्या.

जेव्हा आपल्या घरी कुठल्या बाळाचा जन्म होतो तेव्हा सर्व कुटुंबाचं लक्ष केवळ एकाच गोष्टीकडे लागून असते की, त्या बाळाचं नाव काय ठेवायचं. कारण कुणाचंही नाव हे अतिशय महत्वाचं असतं. कारण ते नाव त्या व्यक्तीची ओळख असते. म्हणूनच कुठलीही व्यक्ती असो, गोष्ट वा ठिकाण त्याला काही ना काही महत्व आणि अर्थ हा असतोच. तुम्ही कधी आपल्या देशातील राज्यांच्या नावावर लक्ष दिलं आहे का? आपल्या देशातील राज्यांची नावे देखील अशीच अर्थपूर्ण आहेत. त्या प्रत्येकाच्या मागे काही ना काही अर्थ हा लपलेला आहे. आज आपण तेच जाणून घेणार आहोत.

- **मध्य प्रदेश :** मध्यप्रदेश राज्य, ह्या राज्याच्या नावामागे अगदी सिम्पल लॉजिक आहे. हे क्षेत्र भारताच्या मध्यभागी आहे म्हणून ह्याला मध्यप्रदेश हे नाव देण्यात आले.
- **छत्तीसगड :** छत्तीसगड हे राज्य मध्यप्रदेशातून विभक्त होऊन तयार झाले आहे. येथील ३६ ऐतिहासिक किल्लयांमुळे ह्या क्षेत्राला छत्तीसगड हे नाव पडले.
- **झारखंड :** संस्कृत भाषेत 'झार' ह्याचा अर्थ 'जंगल' असा होतो तर 'खंड' म्हणजे जमीन. ह्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात जंगले आहेत म्हणून ह्या क्षेत्राला झारखंड असे नाव देण्यात आले.
- **उत्तर प्रदेश :** उत्तर प्रदेश हे राज्य भारताच्या उत्तर भागात आहे, त्यामुळे ह्या क्षेत्राला उत्तरप्रदेश असे नाव देण्यात आले.
- **उत्तराखंड :** २००० साली उत्तर प्रदेशातून विभक्त होऊन उत्तराखंड ह्या राज्याची निर्मिती करण्यात आली. उत्तराखंड ह्याचा अर्थ 'उत्तरेकडील जमीन' असा होतो.
- **बिहार :** बिहार ह्या राज्याचं नाव संस्कृत शब्द 'विहार' ह्यावरून पडले. ह्याचा अर्थ 'रहाणे'. ह्या क्षेत्रात आधी बौद्ध भिख्खू राहायचे, ह्यांच्यावरून ह्या क्षेत्राला बिहार असे नाव मिळाले.
- **गोवा :** गोव्याचं नाव हे संस्कृत शब्द 'गौ' म्हणजेच गाय ह्यावरून पडले आहे असे काही लोक मानतात. तर काही लोक अें मानतात की, हे नाव युरोपीय किंवा पोर्तुगाली ह्या भाषेतून आले आहे.
- **महाराष्ट्र :** १ मे १९६० साली महाराष्ट्र ह्या राज्याची निर्मिती झाली. महाराष्ट्र हे नाव दोन संस्कृत शब्दांची जोड आहे. ज्यात 'महा' म्हणजे महान, महाराष्ट्र म्हणजे 'महान राष्ट्र'.
- **ओडिशा :** ओडिशा हे नाव संस्कृत शब्द 'ओड्र विश्य' किंवा 'ओड्र देश' ह्या शब्दापासून घेण्यात आले आहे. हा शब्द मध्य भारतात राहणाऱ्या लोकांसाठी वापरला जातो.
- **तामिळनाडू :** तामिळ ह्या शब्दाचा अर्थ गोड आणि नाडू म्हणजे देश. ह्या दोन शब्दांना मिळून तामिळनाडू हा शब्द बनला आहे.
- **कर्नाटक :** कर्नाटक हा शब्द संस्कृत मधील 'कारू' आणि 'नाद' ह्या दोन शब्दांची जोड आहे. ज्याचा अर्थ 'उन्नत भूमी' असा आहे.
- **केरळ :** 'केरलम' हा शब्द चेरा साम्राज्यातून आला आहे, ज्याने १ ते ५ व्या शतकापर्यंत ह्या राज्यावर राज्य केलं. ह्याशिवाय संस्कृतमध्ये 'केरलम' म्हणजे जोडलेली जमीन असा होतो.
- **जम्मू काश्मीर :** 'जम्मू' हा शब्द येथील राजा जंबू लोचन ह्यांच्यावरून घेण्यात आला आहे, तर काश्मीर हा शब्द 'का' आणि 'शिमिरा' ह्यांची जोड आहे. ज्याचा अर्थ 'गोठलेलं पाणी' असा होतो.
- **हिमाचल प्रदेश :** संस्कृतमध्ये 'हिम' ह्या शब्दाचा अर्थ 'बर्फ' तर 'अचल' ह्या शब्दाचा अर्थ पर्वत असा होतो. ह्या दोन शब्दांना मिळून 'हिमाचल' हा शब्द बनला आहे.
- **हरियाणा :** 'हरियाणा' हा शब्द 'हरि' आणि

'आना' ह्या दोन शब्दांपासून बनला आहे. ह्यात 'हरि' म्हणजेच विष्णू भगवान आणि 'आना' म्हणजे 'आगमन'. असं म्हणतात की महाभारता दरम्यान भगवान विष्णू येथे आले होते म्हणून ह्या क्षेत्राचं नाव हे हरियाणा असे पडले.

- **राजस्थान :** राजस्थान हे स्थान आधी राजांच्या राहायचे ठिकाण असायचे. ज्यामुळे ह्या ठिकाणाचं नाव राजस्थान असं पडलं. ह्याआधी ह्या ठिकाणाचं नाव हे राजपुताना असं होतं.
- **गुजरात :** ह्या क्षेत्राचं नाव 'गुजरा' ह्यांच्या नावावरून पडले आहे. ज्यांनी अठराव्या शतकात येथे राज्य केलं होतं.
- **पंजाब :** पंजाब ह्या शब्दाचा अर्थ 'पाच नद्यांची जमीन' असा होतो. हा शब्द इंडो-इरानी शब्द पुंज म्हणजेच 'पाच' आणि 'आब' म्हणजेच पाणी ह्यांच्या एकत्रीकरणातून बनला आहे.
- **पश्चिम बंगाल :** बंगाल हा शब्द संस्कृतमधील 'वंगा' ह्या शब्दापासून बनला आहे. ह्यालाच पुढ जाऊन फारसी भाषेत 'बंगालह' आणि हिंदीत 'बंगाल' तर बंगाली भाषेत 'बांग्ला' असे म्हटले जाऊ लागले.
- **आसाम :** आसाम हा एक इंडो-आर्यन शब्द असल्याचं मानलं जातं, ज्याचा अर्थ 'असमान' असा आहे. तर काही लोकांच्या मते ह्या क्षेत्राचं नाव हे इथे राज्य करणाऱ्या अहोम शासकांच्या नावावरून ठेवण्यात आलं आहे.
- **सिक्किम :** सिक्किम ह्या क्षेत्राचं नाव हे देखील दोन शब्दांच्या एकत्रीकरणातून बनले आहे. ह्यातील 'सु' म्हणजे नवीन आणि 'ख्यिम' म्हणजे 'महल' असा अर्थ होतो.
- **अरुणाचल प्रदेश :** संस्कृतमध्ये 'अरुणा' म्हणजे 'सकाळची किरणे' आणि 'अचल' म्हणजे 'पर्वत' असा अर्थ आहे. ह्या दोघांनी मिळूनच 'अरुणाचल प्रदेश'च नाव पडलं आहे.
- **मणिपुर :** मणिपूर ह्या शब्दांचा अर्थ 'रत्नांची जमीन'
- **मेघालय :** संस्कृतमध्ये 'मेघ' म्हणजे 'ढग' आणि 'आलय' म्हणजे 'आवास', ह्या दोघांनी मिळून 'मेघालय' असं नाव पडलं आहे.
- **मिझोराम :** 'मिझोराम' ह्या शब्दातील 'मि' म्हणजे लोक, 'झो' म्हणजे पहाड. ह्या दोन शब्दांपासून मिझोराम हा शब्द बनला आहे.
- **त्रिपुरा :** एका कथेनुसार ह्या राज्याचे नाव येथील 'त्रिपुर राजा' ह्यांच्या नावावरून पडलं आहे. हे भारतातील तिसरं सर्वात छोटं राज्य आहे.
- **नागालँड :** नागालँड म्हणजे नागांची जमीन असा ह्या शब्दाचा अर्थ होतो.
- **आंध्र प्रदेश :** संस्कृत भाषेत 'आंध्र' म्हणजे 'दक्षिण', तसेच येथे राहणाऱ्या एका जातीचे नाव देखील 'आंध्र' आहे. ह्यामुळेच ह्या क्षेत्राचं नाव हे आंध्र प्रदेश असं पडलं आहे.
- **तेलंगणा :** तेलंगणा ह्या राज्याची निर्मिती २ जून २०१४ साली झाली. आंध्र प्रदेशातून विभक्त होऊन हे नवीन राज्य तयार झालं. तेलंगणा ह्या राज्याचं नाव देखील दोन शब्दांच्या एकत्रीकरणातून तयार झालीं आहे, हा शब्द तेलगू आणि अंगाना ह्या दोन शब्दांपासून बनला आहे. ह्याचा अर्थ म्हणजे जिथे तेलगु बोलली जाते.....

तर हे होते आपल्या देशातील २९ राष्ट्रांच्या नावांमागील लॉजिक...

**कोल्हापूर चित्पावन संघासाठी आपल्या ठेवीची/वर्गणीची रक्कम**
**बँक ऑफ महाराष्ट्र, महाद्वार रोड शाखा**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**खाते क्र. 20128506183)**
**IFSC Code : MAHB0000326**
**येथे पाठवा व KYC पाठवा. किंवा**
**बँक ऑफ इंडिया, शाखा : महाद्वार रोड,**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**खाते क्र. 090210110016181)**
**IFSC Code : BKID0000902**
**येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.**

'नवस्नेह' च्या माध्यमातून आपल्या पाल्याचे विवाह जुळल्यास पालकांनी कृपया याची माहिती कोल्हापूर चित्पावन संघास कळवावी, ही नम्र विनंती.

## कोल्हापूर चित्पावन संघाच्या 'We For Ours' तर्फे आयोजित

# पहिल्या 'कला महोत्सव' ची क्षणचित्रे

















• Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly •
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2022-2024


# SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

ISO 9001-2008
UL Approved

Manufacturers of Printed Circuit Boards
Metal Clad PCBs for LED applications.




- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

**Quality Approvals**
ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO




**HEAD OFFICE :**
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

**FACTORY :**
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800
Fax. : +91 20 6647 1820

**E-mail :** info@shogini.com

**Visit us at :** www.shogini.com


प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.